१९७६)  इवलेसे रोप लावियले द्वारी । तयाचा वेलू गेला गगनावरी ॥  (२००६




# ज्योती



****************************************************************************************************

ईशान्य ओहायो मराठी मंडळ    जानेवारी २००६ : वर्ष विशेषांक    **NEOMM Tax ID: 34-1644989**

## आगामी कार्यक्रम

**होळी: शनिवार दिनांक १८ मार्च सायंकाळी ६ वाजता**

**स्थळ:** Clague Park Cabin

आपले उत्साही व अनुभवी कलाकार सादर करणार आहेत पु. ल. देशपांडे लिखित धम्माल विनोदी नाटक 'वाऱ्यावरची वरात'

**कार्यक्रमाची रुपरेषा**

६:०० वाजता नोंदणी व चहापान
६:३० होळी पेटवणे
७:०० Stand Up Comedy by Milind Kantak
७:२० जेवण
८:३० 'वाऱ्यावरची वरात'
१० ते ११ Dance Program (if time permits)

**शुल्क:**

८ – Members w RSVP/Students
१० – Members w/o RSVP
१२ – Non Members
(१८ वर्षाखालील मुलांना शुल्क नाही.)

**Advertisement Rates**

per bimonthly issue

Qrtr Page: $25
Half Page: $50
Full Page: $75

Set-up fee $15 if reqd. All rates for the Diwali issue are double

## ओंजळीतली फुलं ...

नमस्कार मंडळी,

Cleveland ची "मी" म्हणणारी थंडी. अशा ह्या थंडीतही तुम्ही आवर्जून कार्यक्रमांना येता, एकमेकांच्या सुखदुःखात सहभगी होता आणि मग तुम्हा लोकांनी निर्माण केलेल्या ह्या उबदार वातावरणात ही बोचरी थंडी मग तितकी जाणवत नाही.

नवीन वर्ष सुरु झाले की आपण अनेक संकल्प करतो. ह्या वर्षी "मी माझं वजन कमी करीन", "ह्या वर्षी मी गोड खाणार नाही", "ह्या वर्षी मी कुटुंबातल्या लोकांना जास्त वेळ देईन, वगैरे वगैरे! त्यातले काही संकल्प पूर्ण होतात, पण बरेचसे होत नाहीत असा आजवरचा अनुभव, नाही कां?

ह्या वर्षी आपण सगळेजणच एक संकल्प करुया की, "ह्या वर्षी मी मराठी मंडळाच्या सगळ्या कार्यक्रमांना हजर राहीन. कसा वटतोय हा संकल्प? कारण आपल्या सर्वांची उपस्थिती आम्हाला प्रेरणादायक ठरेल. तर मंडळी, अपणा सर्वंची प्रत्येक कार्यक्रमाला भेट होईल अशी आशा करुन तुम्हा सर्वांना "हे नवीन वर्ष सुखसमृद्धीचे अणि आरोग्यदायी जावो" अशी इच्छा व्यक्त करते.

आपली,
अंजली चितळे

## वाचाल तर वाचाल ......

नमस्कार मंडळी,

नवीन वर्ष सुरु झाले आणि बघता बघता आपल्या ह्या वर्षीचा पहिला मकरसंक्रांतीचा कार्यक्रमही थाटात पार पाडला. गेल्या वर्षी सांस्कृतिक कार्यवाहकाची जबाबदारी सांभाळल्यावर ह्या वर्षी Executive कमिटीमध्ये एखाद्या पदाची जबाबदारी घेण्याचा विचार होता, पण इतक्या लवकर अध्यक्ष्यपदाची जबाबदरी अंगावर पडेल अशी अपेक्षा मात्र नव्हती.

आपल्यात "नवा भिडू नवे राज्य" असे म्हणायची पदधत आहे. पण खरे सांगायचे तर भिडू जरी नवा असला तरी राज्य मात्र जुनेच आहे. काही वर्षापूर्वी आपल्यातल्याच काही लोकांनी NEOMM नावाचे एक छोटेसे रोपटे लावले. ह्या पूर्वी आलेल्या माजी अध्यक्षांनी ह्या रोपट्याचे निगुतीने संगोपन करून वृक्ष केला, आणि ह्या वृक्षाचा वटवृक्ष करण्याची जी जबाबदारी तुम्ही माझ्यावर सोपवलीत ती मी पार पाडण्याचा

## कार्यकारिणी २००६

**अध्यक्ष :** नितिन गोखले

**उपाध्यक्षा :** चित्रा लेले

**सचिव:**

**कोषाध्यक्ष :** निलेश कुलकर्णी

**सांस्कृतिक कार्यवाह :**
अनिता अमीन

**सदस्य :** ज्योती हरवाळकर

**वेब मास्टर :** समीर देशपांडे

**स्वयंसेवक :** ज्योती हरवाळकर
सुनंदा कुलकर्णी

**संपादक :** अंजली चितळे
शशिकांत शिंदे

**विश्वस्त :** रजनी दिवान
रजनी शेंदुरे
कृष्णा देशपांडे

**ज्योतीसाठी साहित्य**

गावातील लेखक – कवी मंडळींकडून *ज्योती* मध्ये साहित्याची आवस्श्यकता आहे. आपले लेख, कथा, कविता, ईनोद; दर सम महिन्याच्या (फेब्रु., एप्रिल, जून इत्यादि) १५ तारखे पर्यंत इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठवावे. मराठी टायपिंगची सोय हस्तलिखित पानी $१० दराने उपलब्ध आहे.

प्रयत्न करेन असे आश्वासन देतो. हेच ध्येय समोर ठेवून ह्यावर्षी आपण मंडळाच्या कामकाजामध्ये काही बदल करायचे ठरविले आहेत. ह्यापैकी काही झालेले व पुढे होणारे बदल आपल्या लक्षात येतीलच. ह्या सर्व बदलांसाठी आपणा सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य आम्हाला वेळोवेळी लाभेल अशी मी आशा करतो.

"निंदकाचे घर असावे शेजारी" असे आपण म्हणतो. हे प्रकर्षाने नमूद करण्याचे कारण असे की कार्यक्रम चांगले झाले तर ज्या उत्साहाने आपण आम्हाला शाबासकी द्याल त्याच उत्साहाने आपल्याला खटकलेल्या गोष्टीही आपण आम्हाला कळवायला विसरू नका. ह्यासाठी यावर्षी आपण कार्यकारणीमध्ये दोन Public Relation च्या नवीन positions तयार केल्या आहेत. आपणा सर्वांना विनंती अशी की Public Relations च्या माध्यमातून तुम्हाला आवश्यक वाटणारे बदल आम्हाला जरूर कळवा.

सर्व कार्यकारिणीतर्फे आपणा सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा. हे नवीन वर्षा आपणा सर्वांना सुखसमृद्धिचे, भरभराटीचे आणि आरोग्यदायी जावो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

कळावे, लोभ असावा ही विनंती.

आपला अध्यक्ष,
नितीन गोखले.

****************************************

**मानी संतांचे वचन –**

गीता समजायला फार अवघड आहे म्हणतात. असेलही. आणि खूप वाचन, अभ्यास, मनन–चिंतन करून समजेलही. पण म्हणजे नक्की काय कळले असेल? असो, कळले तर चांगलेच आहे. पण संतवचन आपल्याला त्याहून सोपा उपाय सुचवतें.

नवीन भाषा शिकायला केवढे प्रयत्न लागतात. आधी अ–आ–इ अक्षरओळख, मग व्याकरण शिकायचे. नाम–सर्वनाम–विशेषण–क्रियापद आणि आणखीही चार अंगे शिकायची. वाचायला शिकायचे. लिहायला शिकायचे, शेवटी बोलायलाही. नवीन भाषेत बोलणे, आपले विचार दुसऱ्या भाषेतून अनुवाद न करतां मांडणें सर्वात अवघड हे शिकल्यानंतर लक्षात येते. आणि सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे लहान मूल प्रथम बोलायला शिकतें व मग यथाक्रम वाचायला–लिहायला. अर्भकाला कोणी व्याकरण शिकवत नाही कीं अक्षरओळख देत नाही. सुरुवात आई–बाबा–पासून होते ती लवकरच सुसंगत वाक्यांपर्यंत पोहोचते – एकही अक्षर वाचतां येण्याआधी. इंग्रजीत याला Direct Method असे सुबक नांव आहे.

याचा गीता शिकण्याशी काय संबंध असे विचाराल. ज्याप्रकारे आईवडील आपल्या मुलाला सहज सोप्या रीतीने भाषा शिकवतात अगदी त्याच रीतीने संत आपल्याला गीता व अध्यात्म सोपे करून सांगतात, आपल्याला शिकण्याची गोडी लावतात. ज्या रीतीने आईवडील स्वतः भाषा सहज बोलतात त्याच रीतीने संत गीतेचा उपदेश सहज आचरतात. एक अडचण, एक अडथळा मात्र आहे. अर्भक आईवडिलांवर पूर्ण अवलंबून असते व समजू लागल्यावरपण विसंबून असते. आपण मात्र संतांचा इतका आधार घ्यायला बिचकतो. ऐहिक सुखवस्तूपणामुळे आवश्यकता भासत नाही. आणि अहंकाराच्या बाधेने अंतर ठेवून राहतो.

संत आपल्याला Direct Method नें गीता व अध्यात्म शिकायला सांगतात. तुकाराम महाराज जेव्हां सांगतात *“जे का रंजले गांजले तयांसी म्हणे जो आपुले । तोची साधु ओळखावा देव तेथेची जाणावा ।।”* ते संतांचे केवळ गुणगान करण्यासाठी नसून सर्वांनां सुलभ मार्ग सुचवण्यासाठी आहे. मार्ग सोपा आहे. नरसी मेहता नेमके हेच गुजराथी भाषेत सांगतात

*“वैष्णव जन तो तेने रे कहिये जे पीड पराई जाणे रे ।।*
*परदुःखे उपकार करे तोये मन अभिमान न आणे रे ।।”*

गीतावचन आहे

*लभन्ते ब्रह्मनिर्वाणम् ऋषयः क्षीणकल्मषाः ।*
*छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः ।।५:२५।।*

ज्यांचे दोष नाहीसे झाले आहेत, ज्यांनी सुखदुःखादि द्वंद्वांवर मात केली आहे आणि जे सर्व भूतमात्रांच्या हिताकारणी रत आहेत असे ऋषि ब्रह्मनिर्वाण प्राप्त करतात. ही झाली सर्वोच्च पातळी. तिथपर्यंत पोहोचायचे कसे?

अध्यात्म शिकण्याची एक पद्धत म्हणजे ग्रंथ वाचून, अभ्यासून आत्मज्ञान मिळवण्याचा प्रयत्न. व्याकरण शिकून भाषा आत्मसात करण्यासारखा हा मार्ग – जरा अवघडच. योगशास्त्राचा अभ्यास करून साधनेद्वारां उन्नती करणे हाही एक मार्ग आहे.. पण योगशास्त्रात सुरुवात सांगितली आहे ती यम-नियम या साधनांनीं. यम म्हणजे अहिंसा, सत्य, अक्रोध, ब्रह्मचर्य, अपरिग्रह यांचा अभ्यास, तर नियम म्हणजे शौच, संतोष, तप, स्वाध्याय, ईश्वरप्रणिधान. हे शब्द तेवढे लक्षात राहिले. पण ते पाळून अभ्यास कसा करायचा हे समजायला हवे ना? याचा इलाज म्हणजे संतवचन मनावर घेणे.

असं पहा. मूल बोलायला लागताना क्रियापद सहज वापरतें. आपण वापरतो तो शब्द क्रियापद आहे याची यत्किंचित जाणीव त्या बालकाला नसते. संतवचन अशाच रीतीने आपल्याला सहज योगमार्गाला लावते, आपल्याला अध्यात्माच्या कोणत्याही थियरीची कल्पनाही नसतानां.

***जे का रंजले गांजले । तयांसी म्हणे जो आपुले ॥***

ही तुकारामांची सूचना पाळतानां आपण दया, मार्दव, करुणा हे गुण सहज जोपासतो. आणि त्यावर ***मन अभिमान न आणे रे ।*** हे नरसी मेहतांचे वचन पाळल्यास निर्मम-निरहंकार वृत्तीही जोपासली जाते. खरे तर आपण कोणते गुण जोणासत आहेत आणि कोणत्या यम-नियमांचा अभ्यास करीत आहोत हे माहीत असण्याची आवश्यकताच वाटत नाही. संतांनां ते माहीत असते एवढा विश्वास पुरे आहे.

आत्मज्ञानाच्या अवस्थेत सर्वांभूतीं परमेश्वर अनुभवता येतो म्हणतात. या आत्मानुभवाच्या प्रगतीत तीन पल्ले गाठायचे असतात. स्वामी माधवानंदांनीं गोंदवलेकर महाराजांचे सोपे विवेचन एका प्रवचनात सांगितले. सुरुवात करायची असते ती ***ईश्वर आहे*** ही **भावना** हृदयी ठेवून. बऱ्याच अभ्यासानंतर, प्रयासानंतर त्या भावनेचा उत्कर्ष ***ईश्वर आहेच*** या **विश्वासा**त होतो. त्याही पुढे वाटचाल करीत राहिल्यावर यथावकाश या विश्वासाचे पर्यवसान ***सर्वत्र सर्वांभूतीं ईश्वरच आहे*** या **आत्मानुभवा**त होते, यास ते **भाव** म्हणतात. म्हणजे भावना ते विश्वास ते भाव अशी ही वाटचाल असते. शब्द दिसायला सोपे दिसतात आणि वाचायला बरे वाटतात. पण ते आचरणांत यायचे कसे ?

नरसी मेहता भजनांत पुढे म्हणतात ***सकळ लोकमां सहुने वंदे । निंदा न करे केनी रे ॥*** या भक्त-लक्षणापासून सुरुवात करणे सोपे नाही कां? आपण कोणा एकाला वा समाजातल्या एका वर्गाला रंग-रूपावरून हीन मानतो, व वेळ आल्यास तसे हीन मानून बोलतो व त्यांच्याशी तसे वागतोही.

नरसीभगतांचे ऐकायचे असल्यास या असल्या भावनेला, व नंतरच्या बोलण्या-वागण्याला जाणीवपूर्वक आळा घालणे अवघड नाही. एकनाथमहाराज हेच ***जनीं जनार्दन ऐसा भाव*** या शब्दांत व्यक्त करतात.

पण याचा अर्थ असाही मानू नये की भोळसटपणे कुणालाही व कशालाही चांगले म्हणावे. तुकाराममहराज त्यांच्या परखड भाषेत सांगून गेले की ***भले तरी देऊ गांडेची लंगोटी । नाठाळाचे काठी देऊ माथां ॥*** तात्पर्य आपली गाठ कुणाशी पडली आहे हे यथार्थ जाणून मग बोलायचे-वागायचे ते विचारपूर्वकच, पण सर्व पूर्वग्रह बाजूला सारून. कुणाला भाषेच्या अडचणीच्यापायी महाराजांचे शब्द बदलावेसे वाटतात. पण त्यानें मूळ संतवचनांतील उत्कटता नाहीशी होते.

संतवचन मनावर घेऊन तसे वागावे. पण त्याहून आणखी स्फूर्तीदायक असते ते संतांचे जीवन, त्यांचे आचरण. ***बोले तैसा चाले त्याची वंदावी पाउले ।*** असे आपण ऐकतो व ते आणल्याला पटतेही.

समर्थ सांगतात (मनाच्या श्लोकांत) ***सदा बोलण्यासारिखे चालताहे । अनेकी सदा एक देवासि पाहे । सगूणी भजे लेश नाही भ्रमाचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥*** संतांचे बोलणे व वागणे असे प्रामाणिक व भ्रमरहित असते आणि प्रमाण असतो त्यांचा आत्मानुभव. यामुळेच त्यांची स्थितीच प्रासादिक (पहा गीता २:६५)असते, व अर्थातच त्यांचे सांगणेही.

मराठी भाषिकांनां संतपरंपरेची फार मोठी देणगी आहे. ज्ञानेश्वर माउली, नामदेव शिंपी, गोरा कुंभार, चोखा महार, सेना न्हावी, सावता माळी, जनाबाई मोलकरीण, तुकाराम वाणी, समर्थ रामदास अशा थोर संतांनी आपल्याला मार्ग सोपा केला आहे. तुकाराममहाराज तर म्हणूनच गेले की ***तुका म्हणे सोपी केली पायवाट । उतरावया भवसागर रे ॥*** आणि संतवचन नेहमीच स्वानुभवावर अधिष्ठित असते. त्यामुळे त्यांत कुठेही संदिग्धता नसते. गोरा कुंभार म्हणाले की ***निर्गुणाचे भेटी आलो सगुणासंगे । तंव झालो प्रसंगी गुणातीत ॥*** सर्वच संत अशा आत्मविश्वासानें सांगतात. ते मनावर घेण्याची इच्छा व्हायला भाग्य लागत असावे.

**– कौस्तुभ लेले**

****************************************

**बघा तुम्हाला जमतयं का !**

अचानक मुंबईला जावे लगल्याने reservation न करताच मी reservationच्या डब्यात घुसले. पुणे – मुंबई गाडी खचाखच भरली होती. तशी पुणे-मुंबई गाडीला गर्दी असते पण त्यात सुट्टीचे दिवस असल्याने जरा जास्तच गर्दी होती. ऐका बाकावर तशी चार ते पाच मणसे सहज बसू शकतात, पण reservation केलेल्यांनी आपले आरामात बसणे कां सोडावे? त्यामुळे तेही ऐसपैस बसले होते. ऐका बाईने एका गृहस्थाला विचारले,"जरा सरकून घेतलेत तर मलाही टेकायला जागा मिळेल. चार माणसे सहज बसू शकतात बाकावर." तिने असे म्हणताच त्या माणसाने सरकण्याऐवजी जरा जास्तच ऐसपैस बसून घेतले. उभे राहून राहून खरं तर माझेही पाय दुखत होते, पण विचारायची हिंमत होत नव्हती. एव्हढ्यात माझ्या नावाचा पुकारा करत माझी मैत्रीण त्या गर्दीतुन वाट काढत माझ्यापर्यंत येऊन पोहोचली. मग बाकाला टेकून उभी राहात तिच्या आणि माझ्या गप्पा रंगात आल्या. हसता हसता तिचा धक्का बाकावर बसलेल्या माणसाला लागला. लगेच गोड आवजात ती त्याला म्हणली," Sorry हं, गप्पांच्या नादात चुकून तुम्हाला धक्का लागला. ऐक तर reservation च्या डब्यात reservation नसताना आम्ही घुसतो आणि तुम्हा reservation केलेल्यांना नीट आरामात बसताही येत नाही. पण माफ करा हं, Station वर येईपर्यन्त गाडी सुटायची वेळ झलेली तेव्हा समोर दिसेल त्या डब्यात घुसले. तिच्या अशा बोलण्याचा त्या गृहस्थांवर चांगलाच परिणाम झाला. बाकावर बसलेल्या सर्वांना थोडे थोडे सरकायला सांगून त्यांनी आम्हां दोघींनाही बाकावर

बसायला
जागा करुन दिली. मग उरलेला प्रवास आम्ही मजेत केला. म्हणजे आधीच्या बाईला दाद न देणारा गृहस्थ माझ्या मैत्रिणीच्या गोड बोलण्याने विरघळला.

माणसाचे असेच आहे. आपण आवाज चढवून "अरे" केले की "का रे" असा प्रतिध्वनी ऐकू येतो. ऐखादा माणूस खूप संतापला आणि समोरचा माणूस जर त्याला शांतपणे सामोरा गेला तर त्याचा राग हळूहळू शांत होतो. आणि माणूस ऐकदा शांत झाला की त्याला त्याची चूक समजावून सांगता येते. गोड बोलण्याने तोटे नक्कीच होत नहीत, नाही का ? पण ह्यासाठी मी पणाचा अहंकार थोडासा बाजूला ठेवावा लागतो नाही का ?

लहान मुलांनाही रागवण्यापेक्षा गोड बोलून संगितलेली चूक लगेच पटते. आर्थात, मोठमोठ्या पदांवर असलेल्या माणसांना आपल्या हाताखालील माणसांच्या चुका दाखवाव्या लागतात. वेळप्रसंगी थोडे कठोरही व्हावे लागते. पण जिथे शक्य आहे तिथे जर आपण मृदु भाषा वापरली तर काय हरकत आहे?

संक्रांतीला आपण म्हणतो, "तिळगुळ घ्या, गोड बोला" असे म्हणून आपण आपापसात गुण्यागोविंदाने राहावे अशी त्यातून शिकवण देतो. प्रत्येकाचे व्यक्तिमत्व भिन्न असते, स्वभाव भिन्न असतात, विचार भिन्न असतात. मग अशा वेळी सामंजस्य निर्माण करायचे असेल तर बोलताना आपण दुसऱ्याचे मन दुखवत नाही ना ऐवढे जरी पाळले तरी साध्या साध्या बोलण्यातून होणारे गैरसमज, वादविवाद सहज टळतील, असे नाही तुम्हाला वटत?

तेव्हा ह्या संक्रांतीच्या निमित्ताने आपण हे करुन बघायला काय हरकत आहे? बघा हे तुम्हाला जमतयं का !

– अंजली चितळे

*************************************
*

# Marathi Mandal of North East Ohio

Registration No. : 778899 Empl. Id. No. : 34-1644989

**Marathi Mandal of North East Ohio (Mandal)**
**Statement of Activities and Changes in Net Working Capital Assets**
**Fiscal Year Ended December 31, 2005**

| **Mandal Operations** | **Income** | **Expenses** |
|---|---|---|
| Membership Dues (annual) -2005 | $865.00 | $0.00 |
| Membership Dues (annual) -2006 | $485.00 | $0.00 |
| Membership Dues (Life) | $0.00 | $0.00 |
| Printing and Publications | $950.00 | $1,149.47 |
| NEOMM Web-site | $0.00 | $159.40 |
| Donations | $116.00 | $0.00 |
| Interest Income (From Trust Funds) | $850.00 | $0.00 |
| Other | $0.00 | $207.59 |
| **Program Services** | | |
| Makar Sankrant | $379.00 | $171.17 |
| Holi | $850.00 | $1,007.58 |
| Maharashtra –Divas | $630.00 | $808.77 |
| Picnic | $179.00 | $142.69 |
| Ganeshotsav | $1,088.00 | $633.76 |
| Sharadotsav | $860.00 | $1,020.75 |
| Diwali | $1,486.00 | $1,913.47 |
| **Total** | **$8,738.00** | **$7,214.65** |
| Change in net working capital assets | | $1,523.35 |
| Net working capital assets, beginning of year | | $8,340.86 |
| Net working capital assets, end of year | | **$9,864.21** |
| Method of accounting - Cash | | |

**Signed/**
**Vijaya Kulkarni**
**Treasurer NEOMM**

**Signed/**
**Shrikant Limaye**
**President NEOMM**

**Signed/**
**Deepa Deshpande**
**Auditor**

# B D S

Financial Service Corporation

*Registered Investment Advisor*

Are your investments focused on your future … or just on today's headlines?

We can help you to

Prepare a roadmap for your future & to stay the course!

**Our services include:**

Retirement Planning    Investment Planning    Savings for College    Tax Planning

Visit our website www.bdsfsc.com to learn more about us.

To get a second opinion,

call us at 440-248-5625 Or e-mail to BDS@BDSFSC.com

***Ashok Shendure, MS, MBA, CFP®, CEBS***
***Rajanee Shendure, MBA, CFP®***

PLANNING Pays Off!℠



**If not delievered, please return to:**
**Nitin S. Gokhale**
**742, Edgewood Road**
**Richmond Heights, OH 44143**